
ब्रह्मतेजो बलंबलम्



स्थापना : १९६४

हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

६१

वर्ष ११ वे : अंक १०
जानेवारी २०२६

स्वागतमूल्य
₹ २०/-

# मासिक नवस्नेह



## तिळगूळ घ्या गोड बोला....!

• प्रेषक •

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५

Visit us on www.kolhapurchitpavan.com

ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com

https: //www .facebook.com/kolhapurchitpavan

## उत्साहात पार पडलेला धुंदुर्मास सोहळा !





रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ रोजी कोल्हापूर चित्पावन संघ, ब्राह्मण सभा करवीर, कऱ्हाडे ब्राह्मण संघ यांचेसह इतर ब्राह्मण संस्थांच्या सहसंयोजनाने धुंदुर्मास कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

शहरातील मध्यवर्ती पेटाळा क्रीडांगणावर सकाळी ६ वाजता सनई चौघड्याच्या मंगल निनादात हळदी-कुंकू, अत्तर, गजरे व आलेपाकवडी देऊन, तसेच तिलक लावून उपस्थित स्त्री पुरुषांचे स्वागत करण्यात आले.

सकाळी ६.३० वा. सूर्यपूजन सुरु झाले. ७.२५ वा. सौ. व श्री. डॉ. गुणे आणि सौ. व श्री. कुलकर्णी यांच्या हस्ते आरती व पूजा करण्यात आली. नंतर डॉ. आंबर्डेकर आणि श्री. मकरंद करंदीकर यांनी प्रास्ताविक केल्यावर सुप्रसिद्ध गायिका शमिका भिडे यांच्या सुश्राव्य भावगीतांची मैफिल भूपाळीने सुरू झाली. त्यांनी गगन सदन, सुंदर ते ध्यान, बोलावा विठ्ठल, केव्हा तरी पहाटे, हृदयी प्रीत, का रे दुरावा अशा सुश्राव्य मराठी गीतांसह चंदनसा बदन, जब दीप जले, मेरी आवाज ही पहेचान अशी अनेक हिंदी-मराठी अवीट गोडीची गीते सादर करीत भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली.

शमिका भिडे यांच्या मैफिलीने मन तृप्त झालेल्या श्रोत्यांनी गुळाची पोळी आणि साजुक तूप, बाजरीची भाकरी, लोणी, खर्डा, दही, वांग्याचे भरीत, लेकुरवाळी भाजी, कांदापात, भजी, मुगाची खिचडी, गरमागरम कढी अशा सुग्रास भोजन प्रसादाचा आस्वाद घेतल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली.

श्री. धर्मराज पंडीत यांनी आभार प्रदर्शन केले. मध्यंतरात सर्व कलाकारांचा आणि प्रायोजकांचा सत्कार करण्यात आला..

पाच वर्षापूर्वी २०० ते ३०० च्या उपस्थितीत होणारा हा सोहळा आज जवळ जवळ तेराशे ते दीड हजार पर्यंत पोहचला यातच या सोहळ्याचे यश आहे. आपण सर्वांनी या कार्यक्रमात अतिशय उत्साहपूर्वक सहभाग घेतल्याबद्दल आपल्या सर्वांचे आभार! असाच संस्थेवरील आपला लोभ कायम रहावा ही विनंती.




## जादूच्या पेटी : स्वर तालाचा अद्भूत संगम!



अष्टपैलू अशा हार्मोनियमच्या सांगीतिक प्रवासाचा अनुभव घेण्यासाठी सज्ज व्हा! हा जागतिकदृष्ट्या अनोखा कार्यक्रम केवळ मनोरंजनच करत नाही, तर शिक्षणही देतो, फ्रान्समध्ये झालेल्या हार्मोनियमच्या जन्माच्या इतिहासापासून त्याच्या भारतातील प्रवेशापासून ते भारतच्या विविध संगीत परंपरेतील त्याच्या मानाच्या स्थानापर्यंतचा प्रवास उलगडतो. शास्त्रीय, उपशास्त्रीय, चित्रपटसंगीत, भावसंगीत, पाश्चात्य आणि लोकसंगीत यांचा समावेश असलेला हा कार्यक्रम अतिशय खुसखुशीत तरीही अभ्यासपूर्ण निवेदन आणि वादनाद्वारे सर्व पिढ्यांमधील प्रेक्षकांची मने जिंकतो.

कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

मासिक नवस्नेह

# नवस्नेह

वर्ष ११ वे : अंक १० : जानेवारी २०२६

- संपादक : श्री. सदानंद दिनकर मराठे
- कार्यकारी संपादिका : प्रा. सौ. मंजुश्री गोखले
  मोबा. : ८८०५३५५२००
- सल्लागार : सौ. पल्लवी देशमुख
  मोबा. : ९४२०४५५९८४

## अनुक्रम

| | |
|---|---|
| १) संपादकीय | ४ |
| २) भारतरत्न धोंडो केशव कर्वे<br>विकास मेहेंदळे | ५ |
| ३) महापराक्रमी मनकर्णिका :<br>झांशीची राणी – वैदेही जोशी | ८ |
| ३) वाढदिवस<br>कमला हर्डीकर | ११ |
| ४) साप-शिडी | १४ |
| ५) रामचंद्र विनायकराव फडके | १६ |
| ६) सन १८५८ पूर्वीची अद्भूत<br>भारतीय शिक्षण पद्धती | १९ |
| ७) 'ज्ञानाई' ग्रंथाला आशीर्वाद ! | २१ |
| चैतन्य भानुदास देगलूरकर | |
| ८) बक्षिस ते पुरस्कार<br>वेदिका फडके | २३ |
| ९) वधुवर माहिती यादी | २५ |

- मुद्रण स्थळ : मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स
  १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
  मोबा. : ९९२१६६९६६६
- अक्षरजुळणी : दीपक मारूती घंटे
  श्री डी.टी.पी. सर्व्हिसेस, कोल्हापूर.
  मोबा. : ९४२३२८२३२४

[redacted]

हीरकमहोत्सवी

**कोल्हापूर चित्पावन संघ**

मंगळवार पेठ, मोबा. : ७६२०५४६२२५
फोन : (०२३१) २५४६२२५/(०२३१) २९९१६७३

- **संचालक मंडळ :**

श्री. मकरंद विष्णू करंदीकर (अध्यक्ष)
मोबा. : ९४२१११३००५
श्री. प्रसाद प्रभाकर भिडे (उपाध्यक्ष)
मोबा. : ९८२२२४८५००
श्री. केदार वसंत जोशी (कार्यवाह)
मोबा. : ७५८८८३९५२७
श्री. संतोष वसंतराव साने (सहकार्यवाह)
मोबा. : ८४५९०१९०९१
सौ. संगिता संजय आपटे (खजिनदार)
मोबा. : ८१४९४८००३४

- **संचालक :**

श्री. सदानंद दिनकर मराठे, मो. ०२३१-२५४१८२३
सौ. सीमा सुरेश गोखले, मो. ९४२०४५५१५९
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये, मो. ९४०४२६०४७०
श्री. किरण विनायक जोशी, मो. ९८९०००३८१०
श्री. श्रीकांत अनंत लिमये, मो. ९४२३९८०३८०
श्री. दत्तात्रय वामन आपटे, मो. ९४२२०४३३६६

- **तज्ञ सल्लागार :**

श्री. प्रसाद खाडिलकर, मो. ९८२२०८४३०५

- **सल्लागार :**

श्री. विष्णू दिनकर वझे, मो. ९६३७२५५९८४
श्री. मोहन मधुकर दातार, मो. ९८८१८७४७०१
श्री. शिरीष श. ताम्हनकर, मो. ९४२२५९००२५
श्री. निनाद खरे, मो. ७०५७१५१५४९
श्री. महेश खाडिलकर, मो. ९४२२०४६६११

कामकाजाची वेळ

**सकाळी ११ ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**
**रविवारी सकाळी ११ ते दुपारी २**

या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय...

नमस्कार मंडळी! कसे आहात? या कडाक्याच्या थंडीनं बेजार केलं असलं तरी आणि घरटी दोन माणसं खोकत असली तरी या थंडीत गरम चहा किंवा कॉफी पिण्याचं सुख काही अजब आहे! असो.

मित्रानों बघता बघता २०२६ आलं की ! खरंच काळाची गती किती अफाट आहे ! म्हणूनच

कायदा पाळा गतीचा
काळ मागे लागला
थांबला तो संपला !

यासाठीच तर आपणही थांबत नाही. आपला नवस्नेह थांबत नाही. मित्रानो, या अंकापासून तीन नवीन विषय आपल्या भेटीसाठी आम्ही आणतो आहोत. तुम्हाला निश्चित आवडतील! नक्की कळवा हं मला. या अंकात मला आणखी काही गोष्टी तुमच्याशी शेअर करून माझ्या आनंदात मला हा माझा नवस्नेहचा परिवार सामील करून घ्यायचा आहे. त्या म्हणजे २० डिसेंबर रोजी, पुण्यात जो आशियातला सर्वात मोठा पुस्तक मेळावा भरला होता, त्या महामेळाव्यात मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे माझी मुलाखत घेतली गेली तर सकाळ प्रकाशनाने काढलेल्या माझ्या 'कहत् कबीर' या कादंबरीचं प्रकाशन एका सामान्य वाचकाच्या हस्ते करून एक नवीन उपक्रम करण्यात आला. लोकांनी या उपक्रमाचं खूप कौतुक केलं आणि मित्रानो तिसरी महत्वाची गोष्ट जी तुम्हा सर्वांच्या सोबत शेअर करताना मला अतिशय आनंद होतो आहे. ती म्हणजे माझा 'ज्ञानाई' हा ग्रंथ साकारला आहे!

मी माऊलींच्या ज्ञानेश्वरीचा सोप्या मराठीत ओवीबद्ध अनुवाद केला असून तोच अनुवाद 'ज्ञानाई' या नावाने ग्रंथरूपात साकारला आहे. सकाळ प्रकाशनातर्फे माझा हा स्वप्नसंकल्प साकारला असून त्या ग्रंथाचे मुखपृष्ठ मला सकाळ ने पाठवले आहे. ते आपल्या नवस्नेहच्या माध्यमातून तुमच्यापर्यंत पोचवते आहे. हा ग्रंथ साकारला, माझ्या आयुष्याचं सार्थक झालं !

मित्रांनो, हा अंक तुमच्या हातात पडेपर्यंत आपला धुंधुरमास झाला असणार आहे. पहाटेच्या मस्त थंडीत सुश्राव्य गायन आणि स्वादिष्ट जेवण ! वा: आता नुसत्या विचारानंच मस्त वाटतंय. आता संक्रांत येते आहे. तिळाच्या अंगावर काटा फुलून तिळगुळ बनतो. गोड बोलायचा संदेश देतो. तर या वाढत्या थंडीनं देहावर काटा फुलवला आहे. दात काकडत असताना गोड बोलणं अवघड आहे. पण गोड तर बोलायचं आहे सगळ्यांशी ! तेव्हा तिळगूळ घ्या, गोड बोला! गुळाची पोळी खाऊन ही थंडी आणि ही संक्रांत साजरी करूया! तिळगूळ देऊन घेऊन गोड बोलू या! आणि महत्वाचं म्हणजे गोड बोलता बोलता नवस्नेह वाचू या !


धन्यवाद ! **सौ. मंजुश्री गोखले**

मोबा. : ८८०५३५५२००

**• नवीन तहहयात सभासद होण्याची संधी •**

*संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.*

# भारतरत्न धोंडो केशव कर्वे



धोंडो केशव कर्वे ऊर्फ (अण्णा कर्वे) यांचा जन्म : १८ एप्रिल १८५८ रोजी झाला यांनी महिलांचे शिक्षण, त्यांचे हक्क, विधवा-पुनर्विवाह यांसाठी आपले १०४ वर्षांचे जीवन वाहिले. इ.स. १९०७ साली त्यांनी महाराष्ट्रात पुण्याजवळील हिंगण्याच्या माळरानावर एका झोपडीत मुलींची शाळा सुरू केली.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे जीवन म्हणजे सामाजिक सुधारणा, विशेषतः स्त्रियांच्या शिक्षणासाठी त्यांनी वाहिलेले आधुनिक ऋषितुल्य जीवन ! त्यांच्या कार्याचा प्रारंभ हा विधवाविवाह पासून झाला आणि त्याची परिणीती स्त्रियांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र विद्यापीठ काढण्यामध्ये झाली. स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी अविरत परिश्रम केले. भारत सरकारनें त्यांना १९५८ मध्ये त्यांच्या १०० व्या वाढदिवसानिमित्त भारतरत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन सन्मानित केले.

रत्नागिरी जिल्ह्यातील मुरुड हे अण्णांचे गाव. शिक्षणासाठी त्यांना खूप पायपीट करावी लागली. इ.स. १८८१ मध्ये मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्या कॉलेजातून त्यांनी गणिताची पदवी संपादन केली. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांचा राधाबाईंशी विवाह झाला. राधाबाई त्या वेळी ८ वर्षांच्या होत्या. वयाच्या २७व्या वर्षी, इ.स. १८९१ साली राधाबाईंचा मृत्यू झाला.

लोकमान्य टिळक हे फर्ग्युसन महाविद्यालयात गणिताचे अध्यापन करीत होते. पण राजकारणाच्या रणधुमाळीत उतरल्यानंतर त्यांच्या रिकाम्या जागी गणित विभागाचे प्रमुख असणारे गोपाळ कृष्ण गोखले यांनी अण्णांना बोलावून घेतले. इ.स. १८९१ ते इ.स. १९१४ या प्रदीर्घ कालखंडात अण्णांनी गणित हा विषय शिकवला.

त्यांच्या सहचारिणी राधाबाई कालवश झाल्या, त्या वेळी अण्णांचे वय तेहेतीसच्या आसपास होते. प्रौढ वयात विधुर झालेल्या पुरुषानेही अल्पवयीन कुमारिकेशीच लग्न करण्याची त्या काळात प्रथा होती. लहान वयात मुलींची लग्ने होत, पण दुर्दैवाने पती लवकर मरण पावला तर त्या मुलीला मात्र त्याची विधवा म्हणून उर्वरित आयुष्य घालवावे लागे. ही समाज रीत नाकारणाऱ्या अण्णांनी पंडिता रमाबाईंच्या शारदा सदन संस्थेत शिकणाऱ्या गोदूबाई या विधवा मुलीशी पुनर्विवाह केला. ही गोष्ट काळाला मानवणारी नव्हती. अण्णा पत्नीसह मुरूडला गेल्यानंतर अण्णांवर सामाजिक बहिष्कार टाकण्याचा ठराव संमत झाला. याच गोदूबाई पुढे आनंदी कर्वे किंवा बाया कर्वे म्हणून ख्यातनाम झाल्या. अण्णासाहेबांच्या कार्यात बाया कर्वे यांचा सक्रिय वाटा होता!

अण्णांचा पुनर्विवाह ही व्यक्तीगत बाब नव्हती; घातक सामाजिक प्रथांविरुद्ध केलेले ते बंड होते. पुनर्विवाहासाठी लोकमताचे जागरण करावे,

या हेतूने २१ मे, इ.स. १८९४ या दिवशी अण्णांनी पुनर्विवाहितांचा एक कुटुंबमेळा घेतला. याच सुमारास अण्णांनी विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळाची स्थापना केली. विधवा-विवाहाला विरोध करणाऱ्या प्रतिगामी प्रवृत्तींना आवर घालणे हे या मंडळाचे काम होते. बालविवाह, जरठ-कुमारी विवाह, केशवपन यांसारख्या अन्याय्य रूढींत अडकलेल्या अनिकेत स्त्रियांना मोकळा श्वास मिळावा म्हणून इ.स. १८९६ मध्ये अण्णांनी सहा विधवा महिलांसह अनाथ बालिकाश्रम काढला. विधवा विवाहोत्तेजक मंडळाची स्थापना केली. विधवा विवाह न्याय संमत मानला जात नव्हता अशा काळामध्ये अण्णांनी विधवा विवाहाचा आग्रह धरून समाजाच्या मानसिकतेमध्ये बदल करण्यासाठी चळवळ उभी केली. या चळवळीचा एकूणच परिणाम म्हणजे या काळामध्ये पुनर्विवाहासाठी समाजाची मानसिकता तयार होऊ लागली. रावबहादूर गणेश गोविंद गोखले यांनी अण्णांचे हे उदात्त कार्य पाहून हिंगणे येथील आपली सहा एकरांची जागा आणि रु. ७५० संस्थेच्या उभारणीसाठी अण्णांकडे सुपूर्द केले. या उजाड माळरानावर अण्णांनी एक झोपडी बांधली. ही पहिलीवहिली झोपडी ही हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थेची गंगोत्री! आज अनेक वास्तूंनी गजबजून गेलेल्या या वैभवसमृद्ध परिसरात अण्णांची झोपडी त्यांच्या तपाचे महाभारत जगाला सांगत उभी आहे.

इ.स. १८९६मध्ये अण्णासाहेबांनी पुण्याजवळील हिंगणे (आता कर्वेनगर) या गावी विधवा महिलांसाठी आश्रम स्थापन केला. इ.स. १९०० मध्ये अनाथ बालिकाश्रमाचे स्थलांतर हिंगण्यास करण्यात आले. याच परिसरात अण्णांनी विधवांसाठी एक हक्काची सावली निर्माण केली. विधवांचे हे वसतिगृह ही एक सामाजिक प्रयोगशाळा होती. या आश्रमात याच ठिकाणी इ.स. १९०७ साली महिला विद्यालयाची स्थापना त्यांनी केली. अण्णासाहेबांची २० वर्षांची विधवा मेहुणी - पार्वतीबाई आठवले - या विद्यालयाच्या पहिल्या विद्यार्थिनी होत. आश्रम आणि शाळा या दोन्हींसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी त्यांनी 'निष्काम कर्म मठा'ची स्थापना इ.स. १९१० साली केली. स्त्रियांना आपल्या आवडीनुसार शिक्षण घेता यावे यासाठी त्यांनी आरोग्यशास्त्र, शिशुसंगोपन, गृहजीवन शास्त्र, आहार शास्त्र असे विषय अभ्यासक्रमामध्ये ठेवले. यामुळे स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली. ग्रामीण भागातही स्त्री शिक्षणाची गरज ओळखून कर्वे यांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्यावर भर दिला. ग्रामीण भागात त्यांनी ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ स्थापन केले व त्याद्वारे अनेक शाळा सुरू केल्या. या तिन्ही संस्थांचे कार्य उत्तरोत्तर वाढत गेल्याने त्याचे एकत्रीकरण करून 'हिंगणे स्त्री शिक्षण संस्था' निर्माण झाली. तिचेच नाव पुढे 'महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था' (थोडक्यात, कर्वे शिक्षण संस्था) असे झाले. १९९६साली त्यांच्या कार्यारंभाला १०० वर्षे पूर्ण झाली म्हणून महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था ही दरवर्षी शैक्षणिक आणि सामाजिक कार्य करणाऱ्या स्त्रिला बाया कर्वे पुरस्कार देते.

त्यांनी एका जपानी महिला विद्यापीठाचे माहितीपत्रक पाहिले होते. जपानच्या महिला विद्यापीठाला भेट दिल्यानंतर अण्णासाहेब अत्यंत

प्रभावित झाले त्यांच्या मनात भारतीय महिला विद्यापीठाचा विचार येत होता. विद्यापीठाची प्रस्तावना म्हणून त्यांनी माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली. शिक्षण संस्थांभोवती कार्यकर्त्यांची तटबंदी असावी म्हणून इ.स. १९१० मध्ये निष्काम कर्ममठ या संस्कारपीठाची स्थापना केली.

इ.स. १९१५ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय सामाजिक परिषदेचे अध्यक्षस्थान अण्णांनी भूषविले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी महिला विद्यापीठ या कल्पनेचा पुनरुच्चार केला. ३ जून, इ.स. १९१६ रोजी महिला विद्यापीठाची स्थापना झाली. स्त्रीशिक्षणाची ही धारा विद्यापीठाच्या रूपाने विस्तार पावली. अंत्यजांना आणि स्त्रियांना दुर्बल घटक लेखून त्यांना विद्येपासून वंचित करणाऱ्या समाजात अण्णांनी आपल्या तपोबलावर हा चमत्कार घडविला. अण्णांच्या कर्तृत्वाने चकित आणि प्रभावित झालेल्या सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी आपल्या मातोश्री नाथीबाई ठाकरसी यांच्या स्मरणार्थ या विद्यापीठास १५ लाख रुपयांची देणगी दिली. या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी या विद्यापीठास सरकारने स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा दिला. अनेक प्रज्ञावंत महिलांनी विद्यापीठाचे कुलगुरुपद भूषविले. अण्णांना अभिप्रेत असणारे बोधवाक्य विद्यापीठाने शिरोधार्य मानले ते असे- संस्कृता स्त्री पराशक्ती! अण्णांच्या प्रयत्नाने अस्तित्वात आलेल्या प्रत्येक संस्थेचे भरणपोषण केले.

इंग्लंड, जर्मनी, जपान, अमेरिका या देशांना भेटी देऊन अण्णांनी आपल्या संस्थांची आणि संकल्पांची जाणीव जगाला करून दिली. बर्लिनमध्ये असताना सापेक्षतावादाचे प्रणेते प्रा. अल्बर्ट आइनस्टाईन यांची त्यांनी भेट घेतली. त्यांनी बर्लिनमधली गृहविज्ञानशाळा पाहिली. टोकियोतील महिला विद्यापीठ पाहिले. अनेक राष्ट्रात स्त्रियांनी चालविलेल्या संस्था पाहिल्या. त्या दर्शनाने सुचलेल्या अनेक नव्या योजना त्यांनी पूर्णत्वास नेल्या. अनेक भारतीय विद्यापीठांनी त्यांना डी.लिट. देऊन सन्मानित केले. 'पद्मविभूषण' हा किताब त्यांना इ.स. १९५५ साली प्रदान करण्यात आला, तर लगेच इ.स. १९५८ साली त्यांना भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न'ने सन्मानित करण्यात आले. एकशेचार वर्षांचे दीर्घायुष्य देऊन निसर्गानेही त्यांना सन्मानित केले. पुण्यातच ९ नोव्हेंबर, इ.स. १९६२ला त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

**- विकास मेहेंदळे**
मोबा. ९४२०१ ५५११४

●●●

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**

**युनियन बँक ऑफ इंडिया,**
महाद्वार रोड शाखा
खात्याचे नांव : **कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
IFSC Code : **UBINO564109**
येथे पाठवा व KYC पाठवा.

**किंवा**

**बँक ऑफ इंडिया**
महाद्वार रोड शाखा
खात्याचे नांव : **कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
IFSC Code : **BKID0000902**
येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.

# महापराक्रमी मनकर्णिका : झांशीची राणी

राणीच्या नावाचा सैनिकांनी जयजयकार केला. राणी म्हणाली,

'शूर वीरांनो, गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी ही लढाई आहे. आपला देश गुलामगिरीत अडकला आहे. तोडा या गुलामगिरीच्या शृंखला आणि मुक्त व्हा! या धरणीची आपणास हाक आहे. तिला मुक्त करा. वीरांनो हे स्वातंत्र्य युद्ध आहे. प्राण पणाला लावून लढा द्या. मी तुमच्यासोबत आहे. सारा देश तुमच्यासोबत आहे. शत्रू बलाढ्य आहे; परंतु तुम्ही शूर आहात. मारा किंवा मरून जा. शरण जाण्यापेक्षा मृत्यू स्वीकारा. माझ्या शूर वीरांनो आता माघार नाही. रणांगणावर मृत्यू आला तर ते वीरमरण आहे. तुम्ही अमर होण्यासाठी तयार राहा. विजय आपलाच आहे!'

राणीच्या बोलण्यामुळे सैनिकात उत्साह आला. प्रत्येकाच्या अंगात वीरश्री संचारली होती. राणीने घोषणा दिली.

'हर हर महादेव ॥'

सैनिकांनीही घोषणा पुन्हा दिली.

'हर हर महादेव ॥'

आणि राणीने आपल्या घोड्याला टाच मारली. राणीचा घोडा भरधाव वेगाने किल्ल्याच्या पूर्व प्रवेशद्वाराकडे झेपावला होता. राणीच्या पाठोपाठ राणीचे सर्व सैन्य वेगाने जात होते.

स्वातंत्र्य देवतेच्या, राणीच्या नावाच्या घोषणा देत सैन्य पुढे पुढे जात होते. तलवारीचा खणखणाट सुरू झाला होता. एकच धुमश्चक्री उडाली होती. राणीचे सैन्य त्वेषाने लढाई करू लागले होते.

शत्रू सैन्य मोठे होते, राणीची तलवार हवेत फिरत होती. राणीच्या आजूबाजूला येणाऱ्या शत्रूला राणी जमिनदोस्त करीत होती.राणी त्वेषाने लढत होती. राणीने दुर्गामातेचे रूप धारण केले होते.आपली धारधार तलवार सभोवती फिरवीत राणी शत्रूस लोळवत होती. ही स्वातंत्र्याची देवी रणरागिणी झाली होती. राणीचे शौर्य नेत्रदीपक होते. राणी रणरागिणी... शत्रुसंहारिणी बनली होती.

ही तेजस्वी पराक्रमी राणी म्हणजे..

दुसरी तिसरी कोणी नाही.. झाशीची राणी.. म्हणजेच आपल्या मोरोपंत तांबे.. यांची एकुलती एक लेक.. मनकर्णिका...

मोरोपंतांची मनकर्णिका ऊर्फ मनू आणि श्रीमंत बाजीराव पेशव्यांची लाडकी छबेली हिचा विवाह झाशीचे महाराज गंगाधरपंत यांच्याशी थाटात पार पडला होता. सर्व नगरवासीयांनी हा लग्नसोहळा आपल्या नेत्रांनी पाहून मनात साठवून ठेवला होता.

मनू आता झाशीची महाराणी झाली होती. सर्व जण तिचे कौतुक करीत होते.झाशीची महाराणी झाली तरी तिचे वय अजून लहानच होते. झाशीनगरीत बाल्यापासून तिचे चौकस मन तिला स्वस्थ बसू देत नव्हते. महाराजांना, गंगाधरपंताना मनूचा करारी... निर्भयीपणा आवडला होता. आपली ही महाराणी हुशार आहे. नगरवासीयांबद्दल तिच्या मनात प्रेम आहे, त्याचप्रमाणे इंग्रजांच्या

बाबतीत तिच्या मनात चीड आहे. ही गोष्टसुद्धा त्यांच्या लक्षात आली होती.कारण लहानपणापासून या इंग्रजांचे वर्तन पाहत ती आली होती. श्रीमंत पेशवेसुद्धा या इंग्रजांच्या वर्तनावर नाराज होते. कंपनी सरकारकडून इथल्या लोकांवर अन्याय करतात,येथील राजांना मंडलीक बनवण्यात ते धन्यता मानतात. हे सगळं मनकर्णिका जाणून होती. म्हणूनच झाशीची महाराणी झाल्यावर गंगाधरपंतांशी विचार विनिमय करून तिने स्त्रियांना लढाईचे शिक्षण देण्यास सुरुवात केली. स्त्रियांनी युध्दकला शिकावी,बलवान व्हावे. घोडेस्वारी , तलवार चालवणे, दांडपट्टा चालवणे इतर कसरती शिकणे महत्त्वाचे आहे. गरजेचे आहे हे ती जाणून होती..

आयुष्यात आलेली अनेक दुःखे पचवून ती समर्थपणे लढली.

लग्नानंतरची राणी लक्ष्मीबाई खरोखरीच धैर्यवान होती. अंगी धाडस होते. कोणत्याही प्रसंगाने खचून न जाता, डगमगून न जाता येणाऱ्या संकटाशी सामना करण्याचा गुण राणीच्या अंगात होता. आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टीबाबत राणी चौकस होती. माणसांना पारखण्यात राणी हुशार होती. राणी घोडदौड करीत असल्यामुळे, कसरती करीत असल्यामुळे शरीराने निरोगी आणि बलवान होती. राणी मनानेसुद्धा खंबीर होती.

एवढे वाईट प्रसंग घडूनसुद्धा राणीने धैर्य सोडले नव्हते. राणी दुःखातून सावरली हे पाहून दरबारातील लोकांना, नगरातील प्रजेला समाधान वाटले होते. आता पुढील वाटचाल कशी करायची या संदर्भात चर्चा करण्यासाठी निष्ठावंतांना राणीने बोलावून घेतले होते. त्यांच्याशी परिस्थितीची चर्चा केली, पुढील वाटचाल कशी करायची याबाबत जाणकारांचे विचार जाणून घेतले.

झाशीचे महाराज गंगाधरराव यांचा मृत्यू होण्याच्या आदल्या साली दामोदरराव याचे दत्तक विधान विधी सर्वांसमक्ष पार पडला होता. महाराजांच्या मृत्यूनंतर मेजर एलिस आणि मेजर मार्टिन राणीला भेटून गेले होते.

राणी लक्ष्मीबाई हुशार होती. गंगाधररावांनी इंग्रज अधिकाऱ्यांच्या साक्षी आणि आपल्या हक्कानुसार धार्मिक पद्धतीने दत्तक विधान केले होते. आपल्या वंशातील पुत्र दत्तक घेतला होता. महाराजांना इंग्रज आपल्या मैत्रीची आठवण ठेवतील आणि आपला दत्तक मंजूर करतील असे वाटत होते; परंतु त्यांच्या मनात मधूनमधून शंकासुद्धा येत होती. राणी त्यासाठी कंपनी सरकारला पत्रे पाठवत होती; परंतु पत्रांचे उत्तर येत नव्हते.

राणीने ते पाहिले आणि इंग्रजांच्या मनातील डाव तिच्या लक्षात येऊ लागला होता. इंग्रज सरकार एका बाजूने मैत्री असल्याचे भासवत असले तरी त्यांच्या मनातील विचार मात्र वेगळाच आहे अशी शंका राणीच्या मनात येत होती.आणि ती शंका रास्त ठरली..

कंपनी सरकारकडून दूत आल्याची बातमी दरबारात आली

राणी चित्राच्या पडद्याआड बसली होती. दरबारात इंग्रजांचा तो दूत हजर झाला होता. कंपनी सरकारकडून आलेल्या त्या खास दूताने लक्ष्मणराव यांच्या हाती एक लखोटा दिला.

राणी पडद्याआड बसली होती. दरबारातील सर्व हालचाली राणीला दिसत होत्या. राणी मात्र

कोणाला दिसू शकत नव्हती. लक्ष्मणरावांना राणीने तो लखोटा वाचण्यास सांगितले. लक्ष्मणराव लखोट्यातील मजकूर वाचू लागले.

झाशी हे संस्थान कंपनी सरकारचे मंडलीक होते. झाशीचे महाराज गंगाधरराव यांचा मृत्यू झाला आहे. महाराज गंगाधरराव यांनी मृत्यूपूर्वी दामोदरराव यास दत्तक घेतले होते; परंतु सन्माननीय गव्हर्नर जनरल यांनी हे दत्तक विधान नामंजूर केले आहे. कंपनी सरकारने झाशी संस्थान खालसा केले आहे. झाशी संस्थान आता ब्रिटिश सरकारात विलीन करण्यात आले आहे.यापुढे येथील सर्व नागरिकांनी स्वतः ला ब्रिटिश सरकारचे नागरिक मानावे..

हा जाहिरनामा ऐकताच सर्वांना धक्का बसला.राणीच्या मनाला हे सर्व ऐकून अतिशय वेदना झाल्या होत्या, राणी काय उत्तर देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मेजर एलिस राणीच्या उत्तराची वाट पाहत ताटकळत उभा होता. राणी काहीच बोलत नाही असे वाटून एलिस मागे वळला होता.

आता राणीच्या मनातील संताप अनावर झाला होता. राणीला हा जाहीरनामा मान्य नव्हता. राणी संतापाने उद्गारली,

'मेरी झांशी नहीं दूँगी । मेरी झांशी नहीं दूँगी।'

राणीचे हे उद्गार ऐकून मेजर एलिस थक्क झाला होता. संपूर्ण दरबार अवाक झाला होता!

राणीचे हे उद्‌गार इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवले आहेत. राणीचे आपल्या भूमीशी, झाशीच्या नगरीशी, प्रजेशी असलेले प्रेम आणि स्वाभिमान इतिहासात अमर झाले!

रणरागिणी झाशीची राणी लक्ष्मीबाई म्हणजे मूर्तिमंत शौर्याची देवी होती. स्वातंत्र्यासाठी प्राणांचे बलिदान देण्यास राणी तयार होती. राणीस मृत्यूभय नव्हते. राणी हाती तलवार घेऊन ज्या वेळी तुटून पडत होती त्या वेळी राणीचा जोश पाहून शत्रूच्या पोटात भीतीचा गोळा येत होता. राणीची तलवार विद्युतगतीने चालत होती. शत्रूला क्षणार्धात यमसदनास पाठवणारी राणी महापराक्रमी होती. तिच्या शौर्याला तोड नव्हती.आपला स्वाभिमान, आपले पावित्र्य, आपल्या झाँसीचे रक्षण करताना राणीस वीरमरण आले होते!

राणीचे जीवन सार्थ झाले होते. एका गरीब ब्राह्मणाच्या पोटी जन्माला आलेल्या या कन्येने आपल्या कर्तृत्वाचा ठसा इतिहासाच्या सोनेरी पानांवर उठवला होता!

**- सौ. वैदेही जोशी**

मोबा. : ९५४५६३५४६५

● ● ●

## निधन वार्ता !

कोल्हापूर चित्पावन संघाच्या सभासद व श्री महालक्ष्मी को-ऑप. बँकेच्या माजी संचालिका सुशीला गोगटे यांचे पुणे येथे दि. ५/१२/२०२५ रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले.

कोल्हापूर चित्पावन संघाचे ज्येष्ठ सभासद ॲडव्होकेट श्री. सुधाकर विनायक देशमुख यांना कोल्हापूर येथे वृद्धापकाळाने दि. १८/१२/२०२५ रोजी दुपारी देवाज्ञा झाली.

**कोल्हापूर चित्पावन संघातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली !**

# वाढदिवस

## (मनाला खुपणारं कागदावर - लेखांक ४)

आजकाल घरोघरी एखादा सण साजरा करणं राहील पण प्रत्येकाचा वाढदिवस मात्र मोठ्या उत्साहानं साजरा केला जातो आणि ते सुद्धा अगदी दरवर्षी. (पूर्वी कदाचित् आयुमीन कमी असल्यामुळे असेल पण प्रत्येक वर्ष वाढदिवस साजरा न करता पन्नाशी, एकसष्टी, एकाहत्तरी, पंचाहत्तरी, सहत्र चंद्रदर्शन (८१ वर्षे वयाला) अशा प्रकारे त्या व्यक्तीच्या वाढदिवस साजरा केला जाई. या दिवशी वयाची जेवढी वर्षे पूर्ण झाली असतील, तेवढ्या दिव्यांनी त्या व्यक्तीला औक्षण केले जाते. आयुष्याचे प्रत्येक वर्ष म्हणजे एक दिवा. आजवरच्या आयुष्यात तुम्हाला मिळालेल्या बऱ्यावाईट अनुभवांच्या प्रकाशामुळे तुमचं उर्वरित आयुष्यही उजळून निघू दे असंच जणू हा प्रत्येक दिवा सांगत असतो. सर्वसामान्यपणे पूर्वी मूल एक वर्षाचं होईपर्यंत प्रत्येक महिन्याचा वाढदिवस, नंतर पहिलं वर्ष पूर्ण झाल्यानंतर आणि त्यानंतर विद्याभ्यास सुरू करण्यापूर्वी म्हणजे साधारण वयाच्या सातव्या वर्षी वाढदिवस साजरा केला जात असे. आजच्याप्रमाणं केक कापणं, भेटवस्तूंची देवाण-घेवाण इ. निश्चितच केले जात नसे!

आजही आपण म्हणतो One to Walk, Two to Talk म्हणजे मुलाची वाढ योग्य प्रकारे होत असेल तर वयाच्या पहिल्या वर्षी मुल पाऊले टाकू लागलं पाहिजे आणि या भूमीवर पहिलं पाऊल टाकण्याच्या या महत्वाच्या वयाचा वाढदिवस साजरा करण्यामध्ये निश्चितच औचित्य असतं. ज्या अपत्याचा वाढदिवस असेल त्याला घरांतील खांबाला टेकून बसविलं जायचं. त्याच्या डोक्यावर कापूस आणि हराटी (हराटी एक प्रकरचे गवत, या गवताचे शेंडे म्हणजे दुर्वा) ठेवली जाते असे. त्यानंतर औक्षण केले जाई. खांब, कापूस अणि हराटी या तीनही गोष्टी किती अर्थपूर्ण प्रतिक आहेत हे समजून घेतले पाहिजे. खांब म्हणजे भक्कम आधार, खांब जसा घराचा आधार असतो तसाच तूही आमचा सर्वांचा आधार आहेस आणि सदैव आधार देत रहा असं जणू त्या छोट्या मुलाला सांगितलं जाई. कापसासारखे पांढरे शुभ्र केस होईपर्यंत तुला दीर्घायुष्य मिळू दे अशी कामना डोक्यावर ठेवलेल्या कापसावाटे केली जात असे. तसेच डोक्यावर किंवा ओट्यांत घातलेली हराटीही एका छान शुभेच्छेचं प्रतिक आहे. थोडासा ओलावा मिळाला की हराटी कोणत्याही प्रकारच्या जमिनीवर आणि विविध वातावरणात रुजते, वाढते आणि फोफावते. त्याप्रमाणेच आयुष्यात कशाही प्रकारची परिस्थिती आली तरी त्या परिस्थितीला समर्थपणे सामोरे जाण्याचं बळ तुझ्या ठायी येवून तुझं आयुष्य सदैव जोमानं बहरु दे अशी कामना या हराटीवाटे वडील माणसाकडून केली जाते. यानंतर केलं जाणारं औक्षण हे तुझं संपूर्ण आयुष्य आरोग्य, आधार, समृद्धी, ज्ञान, सुख, समाधान आणि आनंद यांच्या प्रकाशानंउजळून निघू दे असंच जणू सांगत असतं. तेज आणि प्रकाशाची पूजक असणारी आमची संस्कृती, औक्षण करायचं हे ठरलेलच. तुझे आयुष्य तसेच आयुष्य समृद्ध करणाऱ्या प्रत्येक गोष्टीची वाढ होऊ दे असा अर्थ औक्षण या शब्दात सामावला आहे.

औक्षण म्हणजेच, ओवाळण्याचा हा विधी करताना ताम्हनात दोन निरांजन ठेवली जातात. या

प्रत्येक निरंजनात तेल आणि कापसाच्या दोन वाती घातल्या जातात. एक वात कधीही घातली जात नाही. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. तो एकटा, एकाकी रहात नाही. निरांजनातील दोन वाती एकमेकीला सांगत असतात, तू एकाकी नाहीस. माझा तुला आणि तुझा मला आधार आहे. त्याप्रमाणेच जणू ओवाळणारी आणि ओवाळून घेणारी व्यक्ती एकमेकांना सांगत असतात. आयुष्यभर आपण परस्परांचे आधार होऊन राहू. ताम्हणात या प्रज्वलित निरांजनाबरोबर सुपारी असते. सुपारीचा मोहोर फारसा गळत नाही. जवळजवळ प्रत्येक फुलाचे फळांत म्हणजे सुपारीत रूपांतर होते. यासाठी सुपारी हे समृद्धीचं प्रतिक मानलं जातं. जोडीला 'अक्षता' असते. अक्षतासाठी अखंड तांदूळ वापरावा असं मानलं जातं. अक्षता शब्द काय सांगत असतो? 'अ' म्हणजे नाही, क्षत म्हणजे इजा, अपाय किंवा जखम. ओवाळून झाल्यावर ओवाळणारी व्यक्ती ज्याला ओवाळलं त्याच्या डोक्यावर अक्षता टाकते आणि या अक्षतांच्या रूपानं जणू मनोमन सदिच्छा व्यक्त करत असते तुला आयुष्यात कोणतीही इजा किंवा हानी होऊ नये. तू सदैव सुरक्षित आणि सुखरूप रहा. ओवळण्याआधी कपाळावर सौभाग्य निदर्शक कुंकुम तिलक रेखला जातो. हा कुंकुम तिलक आठवण करून देतो. आयुष्यात कशीही परिस्थिती आली तरी हतबल होऊ नकोस, निराश होऊ नकोस परिस्थितीला शरण न जाता तिच्याशी दोन हात कर आणि विजयी हो ! परस्परांमधील जवळीक दृढ करणारं आणि त्याचबरोबर पावित्र्याचे बंध निर्माण करतं ते औक्षण!

काल बदलतो आहे. बदलत्या काळाबरोबर आमचा वाढदिवस - साजरा करणं आमूलाग्र बदलू लागलं. घरात, फ्लॅटमध्ये खांबच दिसत नाही त्यामुळे खांबाला टेकून बसणं नाहीच. समजा ९ तारखेला वाढदिवस असेल तर ८ तारखेच्या रात्री १२ नंतर केक कापून वाढदिवस साजरा होतो. केकवर तुमचं वय दाखविणारी प्रज्वलित मेणबत्ती असते, तिची प्रकाशमय ज्योत आधी फुंकून विझवायची आणि मग केक कापायचा. एकमेकांना केक भरवणे आणि कधी कधी केक एकमेकांच्या चेहऱ्याला लावत दंगा सुरू होतो. हे निश्चितच टाळलं पाहजे असं वाटतं. मुलांना तर वाढदिवस म्हणजे भेटवस्तू मिळणार याचाच आनंद असतो. माझी नात सात-आठ वर्षाची असताना तिच्या मैत्रिणीच्या वाढदिवसाला गेली होती. संध्याकाळी सातच्या सुमारास मी तिला आणायला गेले. सगळ्याचं खाणं पिणं झाले होतं. माझ्याप्रमाणेच इतर जणही आपापल्या मुलांना न्यायला आले होते. पण जरा थांबा की थोड्या वेळानं जाऊ या असं म्हणत मुलं आतबाहेर करत होती. अरे उगाच उशीर नको चला बरं म्हटल्यावर एकजण म्हणाला, अजून आम्हाला रिटर्न गिफ्ट कुठं दिलं आहे ? ते घेतल्यावर जाऊ या ना ! किती साधा सरळ हिशोब आहे ना? आम्ही गिफ्ट दिलं मग आम्हाला रिटर्न गिफ्ट मिळालच पाहिजे ना?

हल्ली वाढदिवस साजरा करण्याच्या पद्धती मध्ये 'सरप्राईज' हा शब्द शिरला आहे. ज्याचा वाढदिवस त्याला अज्ञानात ठेवून आगळ्या वेगळ्या पद्धतीने वाढदिवस साजरा करून त्या व्यक्तीला सुखद धक्का देणे म्हणजे सरप्राईज ! अशा दोन घटनांचा उल्लेख मी करत आहे. कामाच्या ताणामुळे 'बाबा' वाढदिवस विसरले होते, पण त्यांची तीन मुलं आणि पत्नी यांच्या लक्षात होतं. फ्लॅटचा मुख्य दरवाजा आणि हॉल यामध्ये एक छोटासा मार्ग होता. दाराच्या चौकटीवर आणि वरील छताच्या खाली अरुंद मार्ग साधारण निम्मा व्यापेल अशी एक छोटी

उताराची छपरी होती. बाबा लँच उघडून आत आले. त्यांच्या सवयीप्रमाणे दार लावलं आणि तीन चार पावलं चालले की फुलांच्या पाकळ्या भरून ठेवलेला कागदी खोका तिरका होऊन बाबांच्या अंगावर पाकळ्या पडतील. ही रचना कार्यान्वित करण्यासाठी छपरीवर तीन चार खिळे मारले होते. अनवधानाने खिळे मारण्यासाठी वापरेलला छोटा पितळी बत्ता त्या छपरीवरच राहिला होता. नेमकं काय झालं माहीत नाही. पण बाबांच्या डोक्यावर पाकळ्या पडल्या पण तो लहान पितळी बत्ताही त्यांच्या डोक्यावर पडला. कळवळून बाबा खाली बसले ! या अनपेक्षित घटनेच्या धक्कयाने प्रसंगाचा सारा नूच पालटला.

थोडाफार असाच आणखी एक प्रसंग. या गृहस्थाना अनेक दिवस अधूनमधून थोडाफार मान दु:खी आणि पाठदुखीचा त्रास होत होता. ज्या संध्याकाळी त्यांना सरप्राईज वाढदिवसाला सामोरं जायचं होतं त्यादिवशी त्याला असह्य डोकेदुखी, मानदुखी आणि पाठदुखी सुरू झाली. ऑफिसमध्ये थांबून काम करणं अशक्य झालं. आपल्या डॉक्टर मित्राला दाखवून येण्याचा निर्णय त्यांनी घेतला. घरचे उगाच काळजी करत राहतील म्हणून मी ऑफिस मधून चारच्या आधी निघून माझ्या मित्राकडे थोडा वेळ जाऊन पाचच्या आतच घरी येईन असा त्यानी फोन केला. डॉक्टर मित्राच्या सुसज्ज पॉलिक्लिनीक मध्ये प्राथमिक तपासण्या आणि अत्यावश्यक चाचण्या होईतोवर आठ वाजून गेले. डॉक्टरच म्हणाले अरे विश्वास आज तुझा वाढदिवस ! हे औषध घे. चल मी तुला घरी सोडतो. सगळेजण वाट पहात असतील. विश्वासरावाना - आपल्या बाबाना घरी आलेले पाहून त्यांच्या काळजीनं हवालदिल झालेल्या सर्व कुटुंबियांनी समाधानाचा सुस्कारा सोडला. पण वाढदिवसाच सरप्राईज पार हरवून गेलं होतं.

आजकाल लहान मोठ्या गल्लीत स्वत:ला दादा समजणारे अनेकजण असतात. जाहीर वाढदिवस साजरा करण्याचा तर त्याना हक्कच. रात्री बारा वाजता प्रचंड आवाजाचे फटाके एका मागून एक उडवायचे, त्यानंतर केक कापणं इ. कार्यक्रम पुढे २/३ तास चालतो. परमेश्वर कृपेनं घराच्या चार भिंतीचा आधार असूनही बेघर असल्याप्रमाणे रस्त्यावर वाढदिवस साजरा करणारे महाभागही आज भेटतात. रहदारीच्या रस्त्यावर वहाने आडवी लावून त्यावर केक कापून वाढदिवस साजरा करणारे महाभागही आढळतात. क्वचित केक कापणसाठी तलवारही वापरली जाते !

वाढदिवस साजरा करून स्वत: आणि आपल्या कुटुंबियासमवेत आनंद प्राप्ती करणं याचं स्वातंत्र्य प्रत्यकाला निश्चितच आहे. पण आपल्या कृतीने समाजाला, आजारी, आबालवृद्ध यांना त्रास होणार नाही तसेच आधीच प्रदूषित असलेल्या हवेचे प्रदूषण आपल्याकडून होणार नाही याचे भानही प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असं म्हणावसं वाटतं. काही क्षणांच्या आनंदासाठी ज्या समाजाचा आपणही घटक आहोत त्या समाजाचे आरोग्य आणि स्वास्थ्य याना बाधा आणणाऱ्या गोष्टी सुजाण माणसाच्या मनाला नेहमीच खुपत राहतात हे निश्चित!

**- कमला हर्डीकर**

मोबा. ९६८९३६९९२६, ९४२०४५८४२५

● ● ●

### निधन वार्ता !

कोल्हापूर चित्पावन संघाचे ज्येष्ठ सभासद श्री. महादेव मोरेश्वर गोखले यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांना कोल्हापूर चित्पावन संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली !

# साप-शिडी

खेळता खेळता छोटी नात धावतच माझ्याकडे आली आणि साप-शिडीचा पट खाली आपटत म्हणाली...

बाबा, या दुष्ट सापाला मारून टाका...

बघा ना... सारखा मला गिळतोय...

तिची बालसुलभ तक्रार ऐकून हातातली काठी उगारत मी म्हणालो...

थांब हं थोडं... आता त्या सापाला या काठीनं मारूनच टाकतो.

मी दिलेल्या आश्वासनामुळे नात निश्चिंत झाली आणि तिनं पुन्हा आपल्या खेळाकडे धूम ठोकली.

आता माझ्यासमोर साप-शिडीचा पट होता. का कुणास ठाऊक पण त्यावरचा लांबलचक साप उगाचच माझ्याकडे बघून हसतोय असं मला वाटलं आणि माझ्या मनात एक प्रश्न डोकावून गेला...

कुणी शोधून काढला असेल हा साप-शिडीचा खेळ...

मग मोबाईलवर नुकताच डाऊनलोड केलेला चाट जीपीटी ओपन केला आणि टाईप केलं...

महोदय, कृपया साप-शिडी अर्थात स्नेक अँड लॅडर या खेळासंबंधीची माहिती द्या.

क्षणार्धात साप-शिडीसंबंधी खूप सारी माहिती माझ्या मोबाईलवर दिसू लागली आणि सगळ्यात शेवटी लिहलं होतं स्नेक अँड लॅडर या खेळाचा शोध १३ व्या शतकात भारतात लागला.

बापरे !

आता मात्र माझी उत्सुकता शिगेला पोहोचली आणि मी वेगवेगळे संदर्भ पाहू लागलो. आश्चर्य म्हणजे वाचता वाचता असं लक्षात आल की ज्याला आपण साप-शिडी किंवा स्नेक अँड लॅडर म्हणतो त्या खेळाचा शोध १३ व्या शतकात लागला हे खरंच होतं, पण या खेळाच्या शोधाचं श्रेय संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्याकडे जातं!

हो... तुम्ही अगदी बरोबर वाचताय, आपली ज्ञानेश्वर माऊली या साप-शिडी खेळाची जन्मदात्री आहे.

कसं घडलं हे सारं...

हे ऐकणंही खूप मनोरंजक आहे. म्हणजे त्याचं असं झालं की...

एकदा मुक्ताबाई आणि तिची भावंडं दुपारच्या प्रहरात अंगणात चेंडू खेळत होती. नेहमीप्रमाणे ज्ञानेश्वर माऊली आपल्या आध्यात्मिक लिखाणात गढून गेली होती. ऊन्हं खूपच वाढू लागली तशी मुक्ताबाई अस्वस्थ झाली आणि धावतच ज्ञानेश्वरांकडे येऊन म्हणाली...

दादा, अरे बघ तर बाहेर, सूर्य कसा आग ओकतोय...

आता तूच सांग असल्या उन्हात आम्ही कसे खेळणार ?

त्यापेक्षा तूच असं काहीतर कर ना की ज्या मुळ आम्हाला घरातल्या घरातच खेळता येईल.

आपल्या लाडक्या बहिणीचा हट्ट पुरविण्यासाठी काहीही करायला तयार असणारे ज्ञानेश्वर क्षणभर विचार करतात आणि एक नवीनच खेळ मांडून देतात, ज्याचं नाव होतं साप आणि शिडी.. कधीही...कुठेही... खेळता येणाऱ्या या साध्या सुध्या खेळात मानवी जीवनासबंधी खूप काही सांगणारं तत्त्वज्ञान भरून राहिलं आहे...

साप-शिडीचा पट हाच मुळात प्रत्येकाचा

जीवनपट आहे. २०x२० इंच आकाराच्या या पटात ५० चौकोनी घरे असतात.

पहिलं घर असतं जन्माचं आणि शेवटचं घर असतं मोक्षाचं. जीवनाचं सार्थक खऱ्या अर्थानं मोक्षातच असतं, या मध्यवर्ती कल्पनेवर या पटाची मांडणी केलेली आहे.

या खेळात, स्वतः तुम्ही, साप आणि शिडी ही पात्रं केंद्रस्थानी असतात आणि तुम्ही प्रत्येक कवड्यांनी दिलेल्या दानाच्या अधीन असता. या कवड्या म्हणजे जणू काळाचं स्वयंप्रेरित रूपच असतं. म्हणूनच त्या खेळाव्याच लागतात आणि जर तुम्ही खेळला नाही तर तुमचा जीवनप्रवास इथंच संपतो.

जीवनातील विविध सुखाच्या वळणावर किंवा टप्प्यावर नेणाऱ्या प्रत्येक शिडीला ज्ञानदेवानी वेगवेगळी नांवे दिलेली आहेत जशी की... सत्संग, सत्कर्म, दया, क्षमा, शांती, प्रेम, सद्बुद्धी तर यातील सापांना नांवे आहेत काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर.

या खेळात कवड्या पूर्ण पालथ्या पडल्या तर बक्षिस (बोनस) दान मिळते. म्हणजे तुमची कृती अर्थात कर्म उत्तम झाले तर तुम्हाला आयुष्यात पुन्हा एकदा संधी मिळते.

नेहमीच्या साप-शिडी पेक्षा ज्ञानदेवांच्या साप-शिडीचं एक आगळं वेगळं वैशिष्ट्य म्हणजे ही साप-शिडी चित्रांकित आहेच परंतु शब्दांकितही आहे. म्हणजे साप शिडीच्या पटाला संलग्न असणाऱ्या दुसऱ्या पटावर कोणती कवडी कोणत्या घरात पडली तर नेमकं कसं वागावं यासंबंधीचं भावपूर्ण मार्गदर्शन अगदी सहज सुंदर ओव्यामधून केलेलं आढळतं. उदा. तुम्ही क्रोधाच्या घरात गेलात तर तिथे तुम्हाला संयमाचं महत्व सांगणारी ओवी भेटेल. तुम्ही विद्येच्या घरात गेला तर विद्या विनयेन कशी शोभते या संबंधीचा गुरुमंत्र भेटतो.

समजा तुम्ही हा साप शिडीचा खेळ, खेळता-खेळता खेळतच राहिलात... तर याचा अर्थ तुम्ही जोपर्यंत शेवटच्या मोक्षाच्या घरासाठी पात्र होत नाही तोपर्यंत जन्म-मृत्यूच्या चौऱ्याऐंशी लक्ष योनीत भरकटतच राहणार.

जीवन प्रवासाचं वास्तविक दर्शन घडविणारा आणि खेळता खेळता नकळत आध्यात्माकडे प्रवाहित करणारा हा साप शिडीचा खेळ खरोखर अद्‌भूत आहे याची प्रचिती येते. म्हणूनच ज्ञानेश्वरांनी या साप-शिडीच्या खेळाचं **'मोक्षपट'** असं समर्पक आणि अर्थपूर्ण नामकरण केलेलं आहे.

काळाच्या ओघात बरेचसे संदर्भ धुसर होत चाललेत हे खरंच आहे. डॉ. एरिक सँड यांचे एक विद्यार्थी सर जेकॉब हे मध्ययुगीन काळात भारतात खेळले जाणारे खेळ या विषयावर संशोधन करत होते त्यावेळी त्यांच्या ध्यानात असं आलं की भारतात १३ व्या शतकात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांनी साप-शिडी खेळाची निर्मिती केली. या सबंधीचा संदर्भ पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयात आजही उपलब्ध आहे.

इंग्रजांच्या भारतातील वास्तव्यात त्यांना बुद्धिबळाप्रमाणेच साप-शिडी हा खेळ खूप आवडला. हळू हळू तो इंग्लंडपर्यंत पोहचला. मग इंग्लंडच्या राणीने त्यात काही बदल केले आणि त्याचं आधुनिक स्नेक अँड लॅडर असं नामकरण करून टाकलं.

माणसाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास या मोक्षपटात सामावलेला आहे. जिज्ञासेपोटी माझ्या वाचनात आलेली ही रंजक माहिती मला खूपच उद्बोधक वाटली आणि ती आपल्यापर्यंत पोहचावी यासाठीच हा लेखप्रपंच...

• • •

# रामचंद्र विनायकराव फडके

प्रत्येक मराठी माणसाच्या हृदयावर कोरलेलं संगीतविश्वातलं भारदस्त नाव म्हणजे सुधीर फडके. प्रसिद्ध मराठी भावगीत गायक आणि संगीत दिग्दर्शक सुधीर फडके. त्यांचे पूर्ण नाव रामचंद्र ऊर्फ सुधीर विनायकराव फडके. पण बाबूजी या नावाने ते अधिक परिचित होते. त्यांचा जन्म २५ जुलै १९१९ साली कोल्हापूर येथे झाला. आई सरस्वतीबाई त्यांच्या बालपणीच निवर्तल्या. वडील विनायकराव वकील होते. बाबूजींचे शालेय शिक्षण कोल्हापुरात झाले. गायनाचार्य पं. वामनराव पाध्ये आणि बाबूराव गोखले यांच्याकडे बाबूजींनी काही वर्षे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. सुख-दुःखांच्या लाटांवर सतत हेलकावे खाणारे असे त्यांचे आयुष्य राहिले. लहानपणीच आई देवाघरी गेली. वडील तसे पेशाने वकील. पण पत्नीच्या निधनाने त्यांनी हाय खाल्ली आणि त्यांचे व्यवसायातील लक्षच उडाले. थोरल्या भावाला शुगर-मिलमध्ये तुटपुंज्या पगाराची नोकरी धरावी लागली. स्वतः संगीत शिक्षण घेत असलेल्या बाबूजींनी पंडितराव ठाणेकर यांच्या श्रीकृष्ण हार्मोनियम क्लासमध्ये शिकवणी घेणे सुरू केले.

बाबूजी श्रीकृष्ण हार्मोनियम क्लासच्या न. ना. देशपांडे यांच्या संपर्कात आले. बाबूजी त्यांच्या त्या क्लासमध्ये गाणे शिकवीत असत. स्वतंत्र चाल कशी बांधावी याचे शास्त्रशुद्ध शिक्षण आणि अर्थातच चिंतन याच काळात घडले. याच देशपांडे सरांनी बाबूजी यांचे नवे बारसे केले आणि रामचे सुधीर फडके झाले. बाबूजी यांनी आयुष्यभर हेच नाव शिरोधार्य मानले.

वडिलांच्या मृत्यू मुळे त्यांना कोल्हापूर सोडावे लागले. १९३७ मध्ये जमखंडीच्या मामाचा निरोप आला की दस्तुरखुद्द अब्दुल करीम खाँसाहेबांनी रामला शिकायला बोलावले आहे. परंतु राम निघण्यापूर्वी पाच-सहा दिवसांतच वर्तमानपत्रात बातमी आली-दौऱ्यावर असतानाच खाँसाहेबांचा हृदयविकाराने मृत्यू झाला.

१९३७-३८ च्या काळात ते मुंबईला आपल्या रायकर या मित्राच्या घरी आश्रिताप्रमाणे राहिले. पण मानी मनाला ते पटेना. तेही घर सोडले. कधी भाजी विक, कधी चहा विक असे करता करता आपली वाद्येही त्यांना विकावी लागली. शेवटी मुंबई सोडून नाशिकला आले. परंतु कुणीही त्यांचं गाणं केलं नाही. खिश्यात केवळ अकरा आणे! अशा वेळी त्यांच्या एका संघ स्वयंसेवक मित्राने मालेगावच्या एका काळे नामक व्यक्तीचा संदर्भ दिला. काळेंनी मालेगावात सुधीर फडकेंचा जाहीर कार्यक्रम केला. चक्क पाच रुपये बिदागीही मिळाली. आपल्या जगाच्या पाठीवर या आत्मचरित्रात बाबूजी लिहितात, त्या दिवशी तो कार्यक्रम झाला नसता, तर मी भुकेने मरून गेलो असतो, गुन्हेगार झालो असतो, नाहीतर चक्क आत्महत्या केली असती!

बाबूजींच्या गाण्याचा जाहीर कार्यक्रम मालेगावात झाला आणि त्यांच्या आयुष्यातील एक नवीन पर्व सुरू झाले. मालेगाव, धुळे, धरणगाव, इंदोर, देवास, बिलासपूर, कानपूर, आग्रा आदि अनेक शहरात बाबूजींना कार्यक्रमासाठी आमंत्रणे येवू लागली. कोलकाताच्या इंडिया रेकॉर्डिंग कंपनीतून त्यांना ध्वनिमुद्रिकेच्या रेकॉर्डिंगचे आमंत्रणही आले. रसिकांचे उदंड प्रेम सगळीकडून त्यांना मिळत होते.

कोल्हापूर सोडून मुंबईत आणि नंतर उत्तर भारतात दोन वर्षे दौरा करून त्यांनी मैफलींमध्ये सादरीकरण केले. यामुळे त्यांना वेगवेगळ्या प्रांतातील लोकसंगीताचा व कलांचा जवळून अभ्यास करता

आला. त्याचा वापर बाबूजींनी आपले संगीत खुलविण्यासाठी केला. त्यामुळे अल्पावधीतच त्यांची एक नावाजलेला गायक व संगीतकार म्हणून ओळख झाली. एचएमव्ही सोबत १९४१ मध्ये त्यांनी आपल्या चित्रपट कारकीर्दीची सुरुवात केली. 'जगाच्या पाठीवर' या चित्रपटातील गीते त्या काळात खूपच गाजल्याने सुधीर फडके यांना खूप प्रसिद्धी मिळाली. स्वतः गायक, गीतकार असल्याने पुढे प्रभात चित्रपट संस्थेच्या माध्यमातून १९४६ मध्ये ते संगीतकार म्हणून उदयास आले.

जुन्या पिढीतील गायिका ललिता देऊळकर यांच्याशी त्यांचा विवाह झाला. ललिता फडके यांनी सांगितलेली लग्नाची आठवण मजेदार आहे. बाबूजी संगीत देत असलेल्या संत जनाबाई या चित्रपटात गाणी गायची संधी मिळाल्याने त्या आईसोबत पुण्याला गेल्या. बाबूजींच्या सांगण्यावरून विरंगुळ्यासाठी त्यांची आई बाबूजींच्या घरी जाऊ लागली. तेथे बाबूजींचे थोरले बंधू नाना यांनी तुमची मुलगी माझ्या भावाशी लग्न करेल का, असा थेट प्रश्न केला. आई म्हणाली, आमची ललिता फार रागीट आहे, लग्न करायचं नाही म्हणते. बाबूजीही रागीटच होते. अखेर हो-नाही करता करता २९ मे १९४९ या दिवशी या दोघांचं पुण्यात लग्न झालं. (या लग्नात मोहम्मद रफी यांनी मंगलाष्टका म्हटल्या होत्या) लग्नापूर्वी सतत गायल्याने गळ्यावर प्रचंड ताण आला होता व गाण्याची हौसही फिटली होती, त्यामुळे लग्नानंतर गाणार नाही, असं ललिता यांनी लग्नापूर्वीच बाबूजींना सांगितलं होतं. बाबूजींनी पत्नीला गाऊ दिलं नाही या प्रवादाला त्यामुळे पूर्णविराम मिळतो. ख्यातनाम संगीतकार आणि गायक श्रीधर फडके हे त्यांचे पुत्र.

कोल्हापूरात त्यांना काही मित्र मिळाले.आणि यातीलच एक मित्र असा मिळाला ज्याच्यासोबत मिळून बाबूजींनी मराठी भावमनावर चिरकाळ साम्राज्य गाजविणारा गीत-रामायण रूपी इतिहास रचला. हा मित्र होता ग. दि. माडगूळकर म्हणजेच गदिमा. कोल्हापूरच्या या मित्रांनी गदिमांचे शब्द व बाबूजींचे संगीत व गायन असणारी रॅकॉर्ड काढली व बाबूजींची पहिली रेकॉर्ड तयार झाली.यादरम्यान आणखी एक आनंदाची गोष्ट घडली. कोल्हापूरात त्यावर्षी आचार्य अत्र्यांच्या अध्यक्षतेखाली अ.भा.मराठी साहित्य संमेलन होते.त्या साहित्य संमेलनात बाबूर्जीसाठी गायनाचे निमंत्रण त्यांच्या एका मित्राने मिळवले. गदिमांचीच एक कविता बाबूजींनी गाऊन दाखवली.त्याला अनेक वन्स मोअर मिळाले आणि साहित्य संमेलन असल्यामुळे बाबूजींचे व गदिमांचे नाव रातोरात चोहीकडे गाजले.

संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावणाऱ्या ग. दि. मां. च्या 'गीतरामायण'चे गायक व संगीतकार म्हणून या क्षेत्रात ते 'संगीत शिरोमणी' म्हणून प्रसिद्धीस आले. तो त्यांना लाभलेला परमेश्वरी प्रसाद होता. त्या प्रसादामागे ग. दि. मां.च्या प्रतिभेचा वरदहस्त होता. या कार्यक्रमात अन्य गीतांचा सामावेश त्यांनी कधीच केला नाही. त्यांचे संपूर्ण महाराष्ट्राला मंत्रमुग्ध करणारे हे गीतरामायण १९५५ साली रेडियोवर सुरू झाले. बाबूर्जीचा सुरेल आवाज, स्पष्ट उच्चार व नेमके स्वराघात यामुळे ते संगीतातील बावनकशी सोन्याचे खणखणीत नाणेच होते. दरम्यान, त्यांनी सुमारे ५६ गाणी असलेल्या गीतरामायणाचे १,८०० प्रयोग देश व विदेशात केले. त्यांच्या कारकीर्दीतील सर्वोच्च क्षण म्हणजे त्यांनी १९६० च्या दशकात स्वरबद्ध केलेले 'गदिमां'चे गीत रामायण! गीत रामायणाचे कार्यक्रम तेव्हा रेडियोवर (All India Radio) वर्षभर प्रसारित होत होते. गीत रामायणाने रसिक श्रोत्यांवर, अगदी सामान्यातल्या सामान्य माणसालाही वेड लावले.

गीतरामायणाचे आजपर्यंत हिंदी, गुजराथी, कन्नड, बंगाली, असामी, तेलुगू, मल्याळी, संस्कृत,

कोकणी अशा विविध भाषांमध्ये भाषांतर झालेले आहे. या सर्व भाषांतरांचे वैशिष्ट्य म्हणजे भाषांतर कर्त्यांनी एका मात्रेचाही फरक केलेला नाही. ही सर्व भाषांतरे मूळ बाबूजींनी दिलेल्या चालीवरच गायली जातात. बाबूजींनी स्वतः त्यांच्या आयुष्यात गीतरामायणाचे देश-विदेशात जवळजवळ १८०० प्रयोग केले आहेत.

गदिमा व बाबूजी या जोडगोळीने असंख्य चित्रपटगीतांचे दान मराठी रसिकांच्या पदरात घालून महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांचे भावविश्व समृद्ध व मधूर केले.१९४६ साली संगीतबद्ध केलेला गोकुळ हा बाबूजींच्या कारकिर्दीतला पहिला चित्रपट. मराठीसह अनेक हिंदी चित्रपटगीतांनादेखील बाबूजींनी संगीत दिले.भाभी की चूडिया मधील ज्योती कलश झलके किंवा किशोरदांच्या आवाजातील खूश हैं जमाना,आज पहिली तारीख हैं ही गीते बाबूजींनीच संगितबद्ध केलेली. पण त्यानंतर मराठी गानसृष्टीच बाबूजींनी अधिक जवळ केली. सुमारे १११ चित्रपटांना त्यांनी संगीत दिले.

चित्रपट गीतांखेरीज अनेक भावगीतेही बाबूजींनी गायलीत. तोच चंद्रमा नभांत, धुंदी कळ्यांना, धुंदी फुलांना, चंद्र आहे साक्षीला, तुझे गीत गाण्यासाठी, देहाची तिजोरी, सखी मंद झाल्या तारका, एकवार पंखावरुनि फिरो तुझा हात यांसारख्या असंख्य गीतांच्या अमृतवर्षावाने आजही मराठी कान तृप्त होताहेत व मराठी माणूस चांदण्यात न्हावून निघतोय. जवळजवळ पन्नास वर्षे मराठी गीत-संगीत सृष्टीचे ते अनभिषिक्त सम्राट होते!

बाबूजींच्या जीवनाचा अनोखा पैलू म्हणजे त्यांची प्रखर राष्ट्रभक्ती, ध्येयनिष्ठा, सर्जनशीलता आणि समाजसेवा. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावान कार्यकर्ते होते आणि काही काळ प्रचारक होते. गोवा मुक्तिसंग्रामात त्यांचा सहभाग होता. दाद्रा व नगरहवेली मुक्तीकरिता बाबूजी आणि त्यांच्या पत्नी ललिताबाई या दोहोंचा सहभाग होता.

बाबूजींनी दिलेल्या संगीत सेवांसाठी त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. अमेरिकेतील 'इंडिया हेरीटेज फाऊंडेशन'चे ते संस्थापक सदस्य होते. 'हा माझा मार्ग एकला' या सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचे राष्ट्रीय पारितोषिक १९६३ मध्ये पं. नेहरूंच्या उपस्थितीत राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते त्यांनी स्वीकारले. तर १९९१ साली राष्ट्रपती वेंकटरमण यांच्या हस्ते संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार स्वीकारला. याशिवाय 'दिनानाथ संगीत पुरस्कार' व राज्यशासनाचा 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' व 'सह्याद्री स्वररत्न पुरस्कार' त्यांना लाभले. तरीही सरकारने त्यांना पद्म पुरस्कारापासून मात्र वंचित ठेवले. मा. सुधीर फडके यांचे २९ जुलै २००२ रोजी निधन झाले.

● ● ●



# सन १८५८ पूर्वीची अद्भत भारतीय शिक्षण पद्धती

आपण लहान असताना आपल्याला फक्त तीन शाखा माहिती होत्या सायन्स, आर्ट्स आणि कॉमर्स.

१९७८ मध्ये इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये फक्त पाच शाखा होत्या : सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स.

पण तुम्हाला ही अद्भत गोष्ट माहिती आहे का की १८५८ पूर्वी आपल्या भारतीय शाळांमध्ये ५० ते ७२ विविध विद्यांचा अभ्यास शिकवला जात होता!

ब्रिटिश धोरणकर्त्यांनी भारतीय शाळांची ही व्यवस्था उद्ध्वस्त केली.

इंग्लंडमध्ये पहिली शाळा १८११ मध्ये सुरू झाली आणि तेव्हा भारतात ७,३२,००० शाळा होत्या!

आपल्या शाळा कशा बंद झाल्या? भारतीय शिक्षणपद्धतीचा अंत कसा झाला?

सर्वप्रथम जाणून घ्या की भारतीय संस्कृतीत कोणकोणती शास्त्रे शिकवली जात होती!

त्यावेळी बहुतेक भारतीय शाळांमध्ये खालील विषय शिकवले जात.

०१ अग्नी विद्या (धातुकर्म) ०२ वायु विद्या (वायुरचना) ०३ जल विद्या (जलशास्त्र) ०४ अंतरिक्ष विद्या ०५ पृथ्वी विद्या (पर्यावरण) ०६ सूर्य विद्या (सौर अभ्यास) ०७ चंद्र व लोक विद्या (चंद्र अभ्यास) ०८ मेघ विद्या (हवामान अंदाज) ०९ धातू ऊर्जा विद्या (बॅटरी ऊर्जा) १० दिवस आणि रात्र विद्या १२ सृष्टी विद्या (अंतरिक्ष संशोधन) १३ खगोल विज्ञान १४ भूगोल विद्या १५ काल विद्या (काल अभ्यास) १६ भूगर्भ विद्या (खाण व भूविज्ञान) १७ रत्ने आणि धातू विद्याशाखा १८ आकर्षण विद्या (गुरुत्वाकर्षण) १९ प्रकाश विद्या (ऊर्जा) २० संचार विद्या २१ विमान विद्या २२ जलयान विद्या २३ अग्नेय अत्र विद्या (शस्त्रात्र) २४ जीवविज्ञान विद्या (जीवशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतिशास्त्र) २५ यज्ञ विद्या (पदार्थ विज्ञान)

ही झाली वैज्ञानिक शिक्षणाची गोष्ट.

आता पाहू या व्यावसायिक आणि तांत्रिक विद्याशाखा ज्या शिकवल्या जात होत्या!!

२६ व्यापार विद्या (कॉमर्स) २७ कृषि विद्या २८ पशुपालन विद्या २९ पक्षीपालन ३० यान विद्या (मेकॅनिक्स) ३२ वाहन डिझायनिंग ३३ रतंकर (जेम्स आणि ज्वेलरी डिझायनिंग) ३६ कुंभार विद्या (मातीची भांडी) ३७ लघु (धातुकर्म आणि लोहार काम) ३८ टकस ३९ रंग विद्या (रंगकाम) ४० खटवाकर ४१ रज्जूकर (लॉजिस्टिक्स) ४२ वास्तुकार विद्या (आर्किटेक्चर) ४३ जेवण बनवण्याची विद्या (कुकिंग) ४४ वाहन विद्या (ड्रायव्हिंग) ४५ जलमार्ग व्यवस्थापन ४६ इंडिकेटर्स (डेटा एंट्री) ४७ गोशाळा मॅनेजर (पशुपालन) ४८ बागवानी ४९ वन विद्या (फॉरेस्ट्री) ५० सहयोगी (पॅरामेडिक्स)

हे सर्व शिक्षण शाळांमध्ये शिकवले जायचे, पण काळाबरोबर शाळाच नाहीशा झाल्या आणि ब्रिटिशांनी हे ज्ञानही नाहीसे केले!!

ही प्रक्रिया मॅकाले पासून सुरू झाली.

आज आपल्या देशातील तरुणांचे भविष्य मॅकाले पद्धतीमुळे उद्ध्वस्त होत आहे.

भारतामधील शाळा शिक्षण कसे संपले?

कॉनव्हेंट शिक्षणाच्या आगमनाने भारतीय गुरुकुल व शाळा मोडीत निघाल्या. १८३५ मध्ये (१८५८ ला सुधारित) इंडियन एज्युकेशन ॲक्ट बनवण्यात आला. याचे मसुदेकार होते लॉर्ड मॅकाले.

मॅकालेने भारतातील शिक्षणव्यवस्थेचा अभ्यास केला होता. त्याच्यापूर्वी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी अहवाल दिले होते. त्यात GW. ल्यूथर आणि थॉमस मुन्रो यांचे अहवाल प्रसिद्ध आहेत.

ल्यूथरने उत्तर भारताचा सर्वे केला व तेथे साक्षरता ९७% असल्याचे लिहिले. मुन्रोने दक्षिण भारताचा सर्वे केला व तेथे साक्षरता १००% असल्याचे लिहिले.

**मॅकाले म्हणाला की भारताला कायम गुलाम ठेवायचे असेल तर त्याची मूळ व सांस्कृतिक शिक्षणपद्धती पूर्णपणे नष्ट करावी आणि तिच्या जागी इंग्रजी शिक्षण आणावे. तेव्हाच भारतीय शरीराने भारतीय असतील पण मनाने इंग्रज होतील. असे लोक ब्रिटिशांच्या हितासाठी काम करतील.**

मॅकालेने एक म्हण वापरली -

**''जशी शेती करण्यापूर्वी जमीन नांगरून सपाट केली जाते, तशीच भारतीय शिक्षण पद्धती नष्ट करून इंग्रजी पद्धती आणली पाहिजे.''**

म्हणून त्याने सर्वप्रथम शाळांना बेकायदेशीर घोषित केले. नंतर संस्कृत बेकायदेशीर ठरवली, शाळांना आग लावली, गुरुंना मारहाण करून तुरुंगात टाकले.

१८५० पर्यंत भारतात ७,३२,००० शाळा आणि ७,५०,००० गावे होती. म्हणजे जवळजवळ प्रत्येक गावात एक शाळा. त्या सगळ्या आजच्या भाषेत हायर लर्निंग इन्स्टिट्यूट्स होत्या. त्यात १८ विषय शिकवले जायचे आणि त्या जनता चालवायची, राजा नाही!

शिक्षण मोफत होते!

या शाळा बंद करण्यात आल्या, इंग्रजी शिक्षण कायदेशीर केले आणि पहिली कॉनव्हेंट शाळा कलकत्यात सुरू झाली. तेव्हा तिला फ्री स्कूल म्हटले जात असे.

याच कायद्याखाली कलकत्ता, मुंबई आणि मद्रास विद्यापीठ स्थापन झाले ही तीनही विद्यापीठे आजही अस्तित्वात आहेत.

मॅकालेने आपल्या वडिलांना पत्र लिहिले होते. ते खूप प्रसिद्ध पत्र आहे. त्यात तो लिहितो:

या कॉनव्हेंट शाळांमधून असे विद्यार्थी बाहेर येतील की दिसायला भारतीय असतील, पण त्यांच्या मेंदूमध्ये इंग्लिश विचार भरलेले असतील. त्यांना देश, संस्कृती, परंपरा, म्हणी काहीच माहिती नसेल. अशा पिढ्या निर्माण झाल्या तर ब्रिटिश भारतातून गेले तरी इंग्लिशपणा कधी जाणार नाही.

त्या पत्रातील सत्यता आजही स्पष्ट दिसते!

आपण स्वतःलाच कमी समजतो, आपली भाषा बोलायला लाजतो, आपली संस्कृती ओळखत नाही.

आईच्या भाषेपासून दूर गेलेला समाज कधी फुलत नाही आणि हीच मॅकालेची रणनीती होती!

**आजचा तरुण युरोपबद्दल जास्त जाणतो, भारताबद्दल कमी**

**भारतीय संस्कृतीला कूल नाही असे समजतो, पश्चिम देशांचे अनुकरण करतो.**

**किती दुर्दैव!**

आता वेळ आली आहे. आपण सगळ्यांनी जागे होऊन आपली महान संस्कृती व परंपरा पुन्हा उभारण्याची! ●●●

# ‘ज्ञानाई’ ग्रंथाला आशीर्वाद !

**नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी ज्ञानेश्वरीची मराठीमध्ये रूपांतरित केलेली ओवीबद्ध रचना सकाळ प्रकाशनातर्फे लवकरच प्रकाशित होत आहे. या ग्रंथाला श्री. चैतन्य देगलूरकर महाराजांनी पाठवलेली प्रस्तावना**

सौ. मंजुश्री गोखले यांनी 'ज्ञानाई' या नावाने केलेली श्रीज्ञानेश्वरीची समओवी रचना पाहिली. समाधान वाटले.

श्रीज्ञानेश्वरी ही श्रीमद्भगवद्गीतेवरील टीका आहे. रणभूमीवर आपल्याच संबंधितांना शत्रू म्हणून शस्त्र घेऊन उभे ठाकलेले पाहून किंकर्तव्यमूढ झालेल्या आणि विचाराच्या विपरीत भूमिकेतून शस्त्रत्याग करणाऱ्या अर्जुनाला भगवान श्रीकृष्णांनी रणभूमीवरच उपदेश केला. या श्रीभगवद्गीतेमधून भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाचे निमित्त करून सकल मानवाच्या कल्याणासाठी अपरिहार्य असणाऱ्या जीवनमूल्यांची सुसूत्र आणि परिपक्व जाणीव जगाला करून दिली. कारण

रात्रं दिवस आम्हा युद्धाचा प्रसंग ।
अंतर्बाह्य जग आणि मन ॥

या श्रीतुकाराम महाराजांच्या वचनानुसान जीवाचेही जग आणि मनाबरोबर प्रपंच-परमार्थाचे युद्ध चालू असते. या युद्धात विपरीत विचाराच्या प्राबल्याने हतबल आणि हतप्रभ झालेल्या जीवाला विचाराच्या निश्चयात्मक भूमिकेवर आरूढ करण्याचे कार्य श्रीमद्भगवद्गीता करते. जन्मजन्मांतरात न संपणाऱ्या संसारपथावरून चालणाऱ्या जीवनरूपी पांथस्थाला विकाररूपीअवरुद्ध करणाऱ्या प्रतिबंधाच्या निवृत्तीसाठी वीतरागासारखा सखा कसा जोडावा आणि त्या आधाराने मोक्षरूपी मुक्काम कसा आत्मसात करावा हे भगवंताच्या शब्दछायेखालीच उमजते. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

की श्लोकाक्षरद्राक्षलता । मांडव जाली आहे गीता ।

संसारपथश्रांता । विसवावया

ब्रह्मतेची पुष्टी आंगा यावी यासाठी अज्ञ जीवाला योग्य साध्याची जाणीव करून देऊन त्या साध्याच्या प्राप्तीसाठी कर्म, उपासना आणि ज्ञानाच्या समन्वयाच्या नियत साधनाचे दिग्दर्शन करणारी श्रीमद्भगवद्‌गीता या भवसागरात भरकटलेल्या जीवन नौकेसाठी दीपस्तंभ आहे.

संस्कृतातून अभिव्यक्त झालेल्या या श्रीकृष्णोक्ती सागराला सहज, तरल व अधिक मधुर करणारी टीका म्हणजे श्रीज्ञानेश्वरी होय ! श्रीज्ञानेश्वरी हे मराठी सारस्वताचे वैभव आहे. तत्त्वज्ञान आणि साहित्याचा अत्यंत रम्य आणि मनोज्ञ संगम या ग्रंथात झालेला दिसून येतो. रसाळपणा आणि तत्त्वज्ञान, आणि शृंगाराच्या माथ्यावर पाय ठेवणाऱ्या शांतरसयुक्त, गंभीर आणि परिपक्व अशा वरकरणी विरुद्ध वाटणाऱ्या संकल्पना श्रीज्ञानेश्वरीमध्ये परस्परपूरक होऊन सुखाने एकत्र नांदताना दिसतात.

श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या भाषेत सांगावयाचे तर,

जेथ साहित्य आणि शांति ।
हे रेखा दिसे बोलती ।
जैसी लावण्यगुणकुळवती ।

आणि पतिव्रता ॥
तैसे कथेचे इथे ऐकणे ।
एक श्रवणासि होय पारणे ।
आणि संसारदुःख भुळवणे ।
विकृतीविणे ॥

असा साध्य आणि साधनरूपाने आनंद देणारा हा अलौकिक, अपूर्व आणि अद्वितीय ग्रंथ आहे. केवळ भगवान श्रीकृष्ण जे बोलले त्यावरच श्रीज्ञानेश्वर-महाराजांनी भाष्य केले नाही तर अनेक ठिकाणी त्या पलिकडे जाऊन तद्नुषंगाने कल्याणाच्या भूमिका अधिक स्पष्ट केल्या. याला श्रीज्ञानेश्वरमहाराज 'गीतेविणही रंगु दावी ।' असे म्हणतात. म्हणून आत्मकल्याणासाठी, जीवनधन्यतेसाठी या ग्रंथाची उपासना आणि अभ्यास या दोन्हीची आवश्यकता सांगितली जाते. आणि अशीच परंपरा आजतागायत चालू आहे. यातील उपासना भावप्रबल असते आणि अभ्यास बुद्धिप्रबल ! त्यामुळे उपासनेत अर्थबोध आणि अर्थभेद याचा विचार करण्याची आवश्यकता नसते. पण अभ्यासात भाषा, शब्द, व्युत्पत्ती, अर्थबोध, अर्थभेद, भावभेद आणि तात्पर्यनिश्चिती आदि विचार अपरिहार्यतेने करावा लागतो. श्रीज्ञानेश्वरी ज्या काळात आविष्कृत झाली त्याकाळात ती सर्वजनसुलभ होती. परंतु कालौघामध्ये ती दुर्बोध वाटू लागली. त्याचा उपासनेवर फारसा परिणाम झाला नसला तरी अभ्यासावर मात्र झाला. त्यासाठी अलीकडील काळात श्रीज्ञानेश्वरीच्या भाषिक सौलभ्याचे जे प्रयत्न झाले त्यामध्ये 'ज्ञानाई' या सौ. मंजुश्री गोखले रचित समओवीच्या स्तुत्य प्रयत्नाचे कौतुक करावेच लागेल.

सौ. मंजुश्री गोखले यांनी श्रीज्ञानेश्वरीची समओवी रचना फार सुंदर केली आहे. छंदोबद्धतचे नियम पाळून अर्थ व भावभेद होऊ न देता अशी रचना करणे कठीण असते. पण सौ. मंजुश्रीताईनी हे कार्य आपल्या अधिकाराने पूर्ण केले आहे. त्या स्वतः उत्तम लेखिका आहेत. अनेक संतचरित्रे व संत वाङ्मयासंबंधीचे प्रामाणिक प्रगल्भ लिखाण आतापर्यंत त्यांनी प्रकाशित केले आहे. प्रतिपाद्य विषयाच्या त्या अंतरंगात जाऊन तो विषय पूर्ण समजावून घेऊन, अभ्यास करूनच त्यावर व्यक्त होण्याचा त्यांचा स्वभाव आहे. विचाराची बैठक पक्की झाल्याशिवाय लिखाणात प्रगल्भता येत नाही. भाषिक सौंदर्याचे भान असल्याशिवाय लिखाण रसाळ होत नाही, आणि स्वभावात मार्दव असल्याशिवाय लिखाणात माधुर्य, भावस्निग्धता येत नाही. या तीनही गोष्टी सौ. मंजुश्रीताईंच्या लिखाणात दिसून येतात. अन्यथा श्रीज्ञानेश्वरीची समओवी रचना करणे धाडसाचे ठरले असते आणि याही पलिकडे जाऊन त्यांच्या अंतःकरणात श्रीज्ञानेश्वर महाराजांबद्दल अढळ निष्ठा, समर्पण आणि विशुद्ध प्रेमभाव आहे, तो या रचनेमधून व्यक्त होतो आहे. अभ्यासकांची फार मोठी सोय त्यांनी केली आहे, त्यामुळे त्या अभिनंदनास पात्र आहेतच, पण अभ्यासक, साधक त्यांचे ऋणी राहतील. या अभ्यासातून त्यांना आनंद प्राप्त होईल असा विश्वास वाटतो.

कैवल्यसाम्राज्य चक्रवर्ती श्रीज्ञानेश्वर महाराजांनी या सेवेने संतुष्ट व्हावे व सौ. मंजुश्रीताईंना स्वानंद साम्राज्य प्रदान करावे, ही प्रार्थना!

श्रीज्ञानदेवपदाश्रित,
चैतन्य भानुदासमहाराज देगलूरकर

# बक्षीस ते पुरस्कार




वर्ष २०२५ च्या सुरुवातीच्या काही आठवड्यात पुणे मराठी टोस्ट मास्टर्स आयोजित कथाकथन स्पर्धेत मिळालेले बक्षीस आणि वर्ष २०२५ संपायला काही आठवडे शिल्लक असताना काल ७ डिसेंबरला जागतिक दिव्यांग दिन ३ डिसेंबर निमित्त अपंग-सेवा-केंद्र सांगली यांच्याकडून देण्यात आलेला ज्ञानोपासक सन्मान.

तसे तर २०२५ या एका वर्षात अनेक व्यक्ती, अनेक ठिकाणे यांची नवी ओळख झाली किंवा जुनी ओळख पुसली जाऊन नव्याने वेगळी ओळख झाली; वेगवेगळ्या चांगल्या वाईट घटना घडल्या. अनेक गोष्टी बंद पडल्या किंवा बंद कराव्या लागल्या. त्यामानाने खूप कमी नवीन काही सुरू करता आले.

आजपर्यंत खूप वेगवेगळ्या परीक्षा दिल्या, विविध स्पर्धांत भाग घेतला आणि बक्षीसे मिळाली. स्पर्धा, परीक्षा यांच्या तयारीत श्रम असतात आणि बक्षीस घेण्यात आनंद असतो. पण एकदम पुरस्कार म्हणजे जरा फारच काहीतरी मोठं वाटतं मला. पुरस्काराबरोबर आनंद मिळण्यापेक्षाही जबाबदारी वाढल्याची जाणीव अधिक झाल्यासारखे वाटले. त्यातही ह्या पुरस्कारासाठी निवड निकषांत दिव्यांगत्व/अंधत्व हा निकष होता याचे दुःखही झाले. याच बरोबर दहावीनंतर शिक्षणाची वाणिज्य शाखा निवडण्यात मी केलेली चूक; ही केलेली चूक निस्तरण्यासाठी CAला घेतलेला प्रवेश आणि अद्याप तो पूर्ण न करू शकल्याची खंत; अभ्यास करणे माझी आवड असूनही अभ्यासाच्या नादात माझेच मानसिक व शारीरिक स्वास्थ्य सांभाळण्यात मला आलेले अपयश; जगाच्या स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी करावी लागणारी सततची कसरत; गमावलेला आत्मविश्वास; स्वतःच स्वतःचे केलेले नुकसान; आणि तरीही याच सगळ्या दरम्यान माझ्याबरोबर प्राणवायूसारखे सतत असणारे- आई बाबा, सर्व शिक्षक, मार्गदर्शक, सगळे नातेवाईक, मित्र-मैत्रिणी, सगळे लेखनिक, कार्यालयातील सहकारी व वरिष्ठ, अशा सगळ्यांची मिळालेली सर्व प्रकारची मदत, यांचे लाभलेले मार्गदर्शन, यांचा मिळालेला पाठिंबा, आणि अमूल्य आशीर्वाद व शुभेच्छा अशा सगळ्याच गोष्टींची परत एकदा

उजळणी, नव्याने जाणीव व आठवण झाली.

कालचा सन्मान हा अपंग-सेवा केंद्र सांगली यांच्या वतीने देण्यात आला. मला ज्ञानोपासक सन्मान, डॉ. अभिजीत सोनावणे यांना अपंग-मित्र पुरस्कार, श्रीमती पूजा कदम यांना ज्ञानगौरव पुरस्कार, श्रीमती स्वाती चव्हाण याना सुकन्या अंध गौरव सन्मान, डॉ. नंदिनी पाटील याना आदर्श माता पुरस्कार, श्रीमती अनघा मोडक याना जिद्द पुरस्कार, असे पुरस्कार प्रदान करण्यात आले. या वर्षीचा संस्थेचा पुरस्कार निवड निकष दृष्टी दिव्यांगत्व/अंधत्व हा होता. वर उल्लेख केलेल्या पुरस्कार प्राप्त व्यक्तींपैकी अभिजीत सोनावणे व नंदिनी पाटील याना वगळता बाकी सर्वजण हे दृष्टी दिव्यांग/अंध होते. शाल, श्रीफळ, मानपत्र, पुष्पगुच्छ, आणि धनादेश असे या सन्मानाचे स्वरूप होते.

कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, सुसूत्रतेने सांगली येथे संस्थेच्या स्वतःच्या वास्तूत पार पडला. संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती निर्मला कुलकर्णी यांचे उत्तम नियोजन जागोजागी जाणवले. कार्यक्रमाची सुरेल गीताने सुरुवात झाली, नंतर संस्थेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी चौकट राजा चित्रपटातील गाण्यावर नृत्य सादर केले. पुढे उपस्थितांचे स्वागत व परिचय, पुरस्कार प्रदान सोहळा व पुरस्कार प्राप्त व्यक्तींनी पुरस्काराला दिलेले उत्तर, प्रमुख पाहुणे डॉ. तुषार धोपाडे यांचे मनोगत, आभार प्रदर्शन, शेवटी वंदे मातरम् आणि विश्व प्रार्थना असा सुटसुटीत कार्यक्रम पार पडला. संस्थेची जी माहिती मिळाली त्यावरून ही संस्था सर्व कार्य लोकवर्गणीतून पार पाडते. दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी होण्यासाठी विविध यंत्रे, विविध वस्तु यांची उपलब्धी करून देते व दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणीक पर्याय व त्यांचे मार्गदर्शन पुरवते. याच कार्यक्रमात संस्थेच्या वेबसाईटचे उद्घाटन करण्यात आले.

ह्या सन्मान प्राप्तीच्या औचित्याने अपंग-सेवा-केंद्र-सांगली ह्या संस्थेला धन्यवाद देते व त्यांचे आभार मानते! आणि आई बाबा, सर्व शिक्षक, मार्गदर्शक, सगळे नातेवाईक, मित्र-मैत्रिणी, सगळे लेखनिक, कार्यालयातील सहकारी व वरिष्ठ अशा सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करते!

संस्थेत कार्यरत विविध पदाधिकाऱ्यांपैकी श्रीमती नंदिनी वेलणकर यांनी माझे नाव या सन्मानासाठी सूचवले होते. त्यांचे आईशी असलेले संबंध विचारात घेऊन मी हा सन्मान स्वीकारायला तयार झाले. पण प्रत्यक्षात हे असे सन्मान हे मला ओझेच वाटते. याचा भार थोडा हलका करण्याच्या उद्देशाने मी पुरस्काराच्या रक्कमेत माझ्या बँक खात्यातून एक रुपयाची भर घालून ती देणगी स्वरूपात याच संस्थेला दिली. आई बाबांनीही याला अनुमोदन दिले.

वर्ष २०२५ ने वैविध्यपूर्ण अनुभव दिले आहेत. येणाऱ्या २०२६ मध्ये बघू काय काय घडते ते.

**- वेदिका फडके**

●●●

**वाचक लिहितात ...**

तुमचे नियमित येणारे 'नवस्नेह' हे मुखपत्र म्हणजे बुद्धीला मेजवानी असते. समकालीन जे डिजीटल विश्व आहे ते व पारंपरिक रूढीतून प्रसवलेले ज्ञान यांचा सुंदर मिलाफ नवयुगात स्थिर राहणेस व Gen-Z मध्ये सामावून जाणेस मदत होते. आज मोबाईलमुळे, मर्यादा सोडून एक वैश्विक असा फोबिया जागतिकीकरणामुळे मानवजातीत झाला आहे. त्याचे दुष्परिणाम हे सृष्टी व दृष्टीस होताना सर्व वर्गास दिसत आहे. पण सिमीत वर्तुळात बुद्धी, तर्क, तंत्रज्ञान व अध्यात्म असे 'नवस्नेह' मधील वार्तांकन मनाला भिडणारे व समृद्ध करणारे आहे. अनंत शुभेच्छा!

**- मोहन शंकर वायचळ**

## – कोल्हापूर चित्पावन संघातर्फे बोडण सोहळा –

आपल्या समाजाचा कुलाचार म्हणजे बोडण सोहळा ! यावर्षीही संस्थेतर्फे सार्वजनिक बोडण सोहळा रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी संस्थेचे 'रमा–दामोदर सभागृह' येथे करणेचे ठरवत आहोत. बोडणाची सर्व व्यवस्था संस्थेतर्फे करणेत येणार असून खर्च प्रतिबोडण रु. ४,०००/– इतका व एक जादा पान प्रसाद भोजन रु. २५०/ – इतका येईल.

(एका बोडणस ४ सवाष्ण व १ कुमारिका – प्रसाद भोजन समाविष्ट)

● संपर्क : कोल्हापूर चित्पावन संघ, मंगळवार पठ, कोल्हापूर. फोन : (०२३१) २५४६२२५

श्रीमती वासंती लिमये : ९१५८८५९६०३ सौ. संगीत आपटे : ८१४९५८००३४




## अनोखा प्रकाशन सोहळा !

गेल्या महिन्यात पुण्यात भरलेल्या पुस्तक महामेळाव्यात सकाळ प्रकाशनाच्या स्टॉलवर एक आगळावेगळा कार्यक्रम केला गेला. आपल्या नवस्नेहच्या संपादिका मंजुश्री गोखले यांच्या 'कहत् कबीर' या कादंबरीचे प्रकाशन एका अभ्यासू पण सामान्य वाचकाच्या हस्ते करण्यात आले. तिथे पुस्तक खरेदीसाठी आलेल्या शिल्पा फडके या तरूणीच्या हस्ते हे प्रकाशन करण्यात आले. विशेष म्हणजे शिल्पा यांनी मंजुश्री गोखले यांची सगळी पुस्तके वाचली असून ती त्यांच्या संग्रहीदेखील आहेत.

## पुणे पुस्तक महामेळाव्यातील लेखकांच्या मुलाखती

पुण्यात भरलेल्या पुस्तकांच्या महा मेळाव्यात मेहता पब्लिशिंग हाऊस यांच्या स्टॉलवर अनेक मान्यवरांच्या मुलाखती घेतल्या गेल्या. त्यात आपल्या नवस्नेहच्या संपादिका मंजुश्री गोखले यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली. त्याचबरोबर आपल्या नवस्नेहच्या लेखिका डॉ. प्रमिला जरग यांचीही प्रकट मुलाखत घेतली. दोन्ही मुलाखतींना श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

## सौ. मंजुश्री गोखले यांची नवी कादंबरी 'ज्ञानाई'



नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी केलेला ज्ञानेश्वरीचा ओवीबद्ध अनुवाद असलेल्या ज्ञानाई या विशेष ग्रंथाचे मुखपृष्ठ. या महिन्यातच सकाळ प्रकाशनातर्फे हा ग्रंथ प्रकाशित होतो आहे. व्हॉटस् अप वरून देखील क्रमशः आपण याचा आस्वाद घेत आहोतच !

## जादूची पेटी कार्यक्रमाच्या तिकीट विक्रीचा शुभारंभ !



कोल्हापूर चित्पावन संघ आयोजित जादूची पेटी या कार्यक्रमाचा तिकीट विक्री शुभारंभ रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी डॉ. नंदकुमार जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी मकरंद करंदीकर, अध्यक्ष, प्रसाद भिडे, उपाध्यक्ष, नंदकुमार मराठे, दत्तात्रय आपटे, श्रीकांत लिमये, खाडिलकर, मुकुंद गोरे, सभासद व मान्यवर उपस्थित होते.

हा कार्यक्रम रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी 'आनंदभवन' सायबर कॉलेज, कोल्हापूर येथे होणार आहे.

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

Quality Approvals
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




HEAD OFFICE :
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

FACTORY :
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

E-mail : info@shogini.com
Visit us at : www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून, कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.